05-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/04/2025 11:08 PM Page 1



## निवडक

### सातेरी केळबाई पुरमार देवस्थानच्या वर्धापनदिनानिमित्त ६ पासून धार्मिक कार्यक्रम

टीम दैनिक हेराल्ड



साळ, दि. ४ : नानोडा – डिचोली येथील श्री सातेरी केळबाई देवस्थानच्या ३५व्या वर्धापनदिनानिमित्त गुरुवार दिनांक ६ रोजी नवचंडी अनुष्ठान त्यानिमित्त सकाळी ८ वाजता पुण्याहवाचन, संभारदान, देवतास्थापना, चंदीपाठ जप, कुंकुमार्चन, आरती मंत्रपुष्प, संध्याकाळी ७ वाजता पार्सेकर दशावतार नाट्यमंडळ निर्मित नाटक भैरी भवानी हा नाट्य प्रयोग सादर होईल. शुक्रवार दि. ७ रोजी सकाळी ८ वाजता देवता स्थापना, श्री सत्यनारायण पूजा, कुंकूमार्चन, चंडीपाठ होम, बलिदान, पूर्णाहुती, आरती, महागाराणे, तीर्थप्रसाद व महाप्रसाद, संध्याकाळी ४ वाजता अवसारी कौल प्रसाद, संध्याकाळी ७ वाजता कै. बाबी कलिंगण निर्मित, कलेश्वर दशावतार नाट्यमंडळ – नेरूर प्रस्तुत दशावतारी नाट्यप्रयोग विधीसंकेत सादर केला जाईल. तरी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रींच्या कृपाप्रसादास पात्र व्हावे ही विनंती.

### इब्रामपूर येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती

टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. ४** : सावित्रीबाई फुले महिला मंडळ गोवाआणि इब्रामपूर रहिवासी यांच्या संयुक्त विद्यमाने सावित्रीबाई फुले यांची जयंती शाहूनगर इब्रामपूर येथे साजरी करण्यात आले यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सतीश कोरगांवकर उपस्थित होते तसेच प्रमुख व्यक्ती आश्विनी प्रवीण भसारकर म्हणाल्या की आपण आपल्या मुलींना खूप शिकवले पाहिजे.

कृष्णा गावकर म्हणाले की, फुले, शाहू व आंबेडकर या थोर नेत्यामुळे आम्ही शिकू शकलो व जगू शकलो खास पाहूणे अशोक परवार यांनी आपल्या विचारांमध्ये फुले शाहू विचार समाजापर्यंत पोहोचणे साठी आपण हे कार्यक्रम घेतो रश्मी रामदास इब्रामपूरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले यावेळी रितिका इब्रामपूरकर व साईनाथ इब्रामपूरकर विचार मंचावर उपस्थित होते.



शिवोली : श्री साखळेश्वर देवाला दांडा प्रदान करताना नीलेश वायंगणकर, आमदार लोबो व इतर.

### साखळेश्वर देवाला दांडा प्रदान

टीम दैनिक हेराल्ड

**शिवोली, दि. ४** : सडये शिवोली येथील श्री साखळेश्वर देवाला दांडा प्रदान करण्यात आला. येथील उपसरपंच व माजी सरपंच नीलेश वायंगणकर यांनी हा दांडा देवाला अर्पण केला.यावेळी आमदार डीलायला लोबो, सरपंच दीपा पेडणेकर, पंच सदस्य शाहू कलंगुटकर, समाजसेवक मोहित चोपडेकर व इतर यावेळी उपस्थित होते.

### मोरजी श्री कानडी वंश देवाचा ९ रोजी वर्धापनदिन

टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. ४ : मोरजी येथील श्री कानडी वंश देवस्थानचा वार्षिक वर्धापनदिन रविवार दि. ९ मार्च रोजी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. सकाळी धार्मिक विधी,लघुरुद्र,अभिषेक,आरती,तीर्थप्रसाद व महा नैवेद्य होईल. तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहून तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

### गोमंतक भंडारी समाजातर्फे पर्वरीत रविवारी वधू-वर मेळावा

टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४** : गोमंतक भंडारी समाजाच्या केंद्रीय समितीतर्फे रविवार दि. ९ रोजी पर्वरी येथील गाडगे महाराज सभागृहात अखिल गोवा वधू –वर मेळावा घेतला जाणार आहे. यासाठी आतापर्यंत ३५६वधू वरांची नोंदणी झाली आहे. मेळाव्याचे उद्घाटन सकाळी ९.३० वाजता केंद्रिय नव ऊर्जा खात्याचे मंत्री श्रीपाद नाईकयांच्या हस्ते होईल. यावेळी सन्माननीय पाहुणे म्हणून जलस्त्रोत मंत्री सुभाष शिरोडकर, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दामोदर (दामू)नाईक व इतर मान्यवर उपस्थित असतील. भंडारी समाजातील उपवर मुला मुलींची योग्य स्थळे जुळून यावीत यासाठी दर दोन वर्षांनी असा मेळावा घडवून आणला जातो, असे केंद्रीय समितीचे अध्यक्ष देवानंद नाईक यांनी सांगितले. वधू वर व त्यांच्या पालकांनी वेळेत हजर राहून सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# मडगावमध्ये रस्त्याच्या कडेला कचऱ्याचा प्रश्न कायम

टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव, दि. ४** : घरोघरी नियमित कचरा संकलन आणि महापालिका अधिकाऱ्यांच्या विविध प्रयत्नांनंतरही, रस्त्यांच्या कडेला आढळणारे 'ब्लॅक स्पॉट्स ' मडगाव नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात मोठी समस्या ठरत आहेत. या समस्येमुळे शहरात अस्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

महानगरपालिकेच्या पाहणीमध्ये या 'ब्लॅक स्पॉट्स ' 'वर मुख्यतः कोंबडीचा कचरा, नारळाच्या साली आणि टेलरिंग दुकानांतून टाकण्यात आलेले कपड्यांचे तुकडे सापडल्याचे निष्पन्न झाले आहे. प्रशासनाने या संदर्भात कडक उपाययोजना राबवण्याचा प्रयत्न केला असला तरी समस्या अद्याप कायम आहे.

नगरपालिकेने आतापर्यंत शहरातील १६ प्रमुख स्थळे'ब्लॅक स्पॉट्स ' म्हणून ओळखून त्यांचा सफाया करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. वारंवार जनजागृती मोहीम आणि दंडात्मक कारवाई केल्यानंतरही अनेक नागरिक रात्रीच्या वेळी कचरा टाकत असल्याचे आढळून आले आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, यामध्ये मुख्यतः शहराबाहेरून येणाऱ्या व्यक्तींचा मोठा सहभाग आहे.

दक्षिण गोवा पोलिसांनी १८ डिसेंबर २०२४ पर्यंत 'गोवा नॉन–जैवविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, १९९६' अंतर्गत ७,३४२ गुन्हे नोंदवले आहेत. मात्र, मडगावसारख्या मोठ्या व्यावसायिक केंद्रात कचऱ्याचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. विशेषतः शहरातील प्रमुख भागांमध्ये हे'ब्लॅक स्पॉट्स ' मोठ्या प्रमाणावर दिसून येतात.मडगाव महापालिकेच्या अहवालानुसार, १७ डिसेंबर २०२४ पर्यंत कचरा टाकण्याच्या केवळ ५७२ घटनांची पोलिस दखल घेण्यात आली. यावरून समस्या किती मोठी आहे हे स्पष्ट होते.

नगरसेवक सगुन नाईक यांनी सांगितले की, महापालिकेच्या नियमित कचरा संकलन उपक्रमांचे कौतुक करावे लागेल. मात्र, काही व्यक्ती अजूनही रात्रीच्या वेळी कचरा टाकताना दिसत आहेत. पूर्वी अधिकारी नियमितपणे तपासणी करत असत, पण दररोज सतत निरीक्षण करणे कठीण झाले आहे, असे नाईक म्हणाले. त्यांनी विशेषतः नारळाच्या सालींच्या प्रमाणात झालेल्या वाढीकडे लक्ष वेधले.

फातोर्डाचे रहिवासी रॉनी फर्नांडिस यांनी सांगितले की, दुर्गा पेट्रोल पंप आणि टाटा मोटर्स गॅरेज परिसरात रस्त्याच्या कडेला वारंवार कचरा दिसतो. हा कचरा सार्वजनिक आरोग्यास धोकादायक ठरत आहे. विशेषतः निवासी भागात स्वच्छतेचा प्रश्न गंभीर झाला आहे. प्रशासनाने साफसफाई केल्यानंतरही दुसऱ्याच दिवशी सकाळी तोच कचरा पुन्हा टाकलेला दिसतो, असे फर्नांडिस यांनी सांगितले.

दुसरे स्थानिक रहिवासी शशांक शिरवाईकर यांनी नगरपालिकेला अधिक कडक उपाययोजना राबवण्याचे आवाहन केले. फक्त दंड वसूल करून समस्या सुटणार नाही. कठोर नियंत्रण आणि प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले.मडगाव नगरपालिकेचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी सांगितले की, सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकण्याच्या समस्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासन सातत्याने कार्यरत आहे. आम्ही यापूर्वीही अनेक व्यक्तींवर कारवाई केली आहे. त्यात मोठ्या प्रमाणावर शहराबाहेरील लोकांचा सहभाग असल्याचे आढळले आहे.

काही प्रकरणांत शेजारच्या गावांतील हॉटेल मालक आणि चिकन विक्रेतेही जबाबदार आढळले आहेत, असे शिरोडकर यांनी स्पष्ट केले.

त्यांनी नमूद केले की, मागील वर्षांच्या तुलनेत परिस्थितीत सुधारणा झाली असली तरी समस्या पूर्णतः सुटलेली नाही. भविष्यात अधिक कठोर उपाययोजना करून रस्त्याच्या कडेला कचरा टाकण्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी नवीन धोरण राबवण्याचा विचार प्रशासन करत आहे.

## भाटले येथे मुख्य जलवाहिनी फुटल्याने पाणीपुरवठा विस्कळीत



टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ४** : भाटले येथे मुख्य जलवाहिनी फुटून महिनाही उलटत नाही तोच मोठ्या प्रमाणात पाणीगळती झाल्याने स्थानिक रहिवाशांना पाणीटंचाईचा सामना करावा लागला. या दुर्घटनेमुळे तब्बल २२ तास पाणीपुरवठा खंडित राहिला असून, ताळगाव आणि दोना पावला भागातील नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

इमॅजिन पणजी स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट लिमिटेड ने स्पष्ट केले आहे की, ही जलवाहिनी फुटण्याची घटना स्मार्ट सिटी प्रकल्पाशी संबंधित नाही.तसेच, यास जबाबदार कोण, याबाबत स्थानिक प्रशासनाकडून शंका उपस्थित करण्यात आली आहे.

दरम्यान, सांतइनेज परिसरात पडलेल्या एका रेस्टॉरंटच्या ढिगाऱ्यामुळे जलवाहिनीला अडथळा निर्माण झाल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे पाइपलाईन तुटली आणि मोठ्या प्रमाणावर पाणीगळती झाली. परिणामी, नेवगीनगर, फोंतेनहाससह अनेक भागांत पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

या पाणीटंचाईमुळे स्थानिक रहिवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. जोविती लोपेस, स्थानिक रहिवासी, यांनी सांगितले की , गेल्या चार दिवसांपासून आम्हाला पाणी मिळालेले नाही. नेमकी समस्या काय आहे, हेही आम्हाला सांगितले जात नाही. आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार केली असली तरी अद्याप कोणतीही दुरुस्ती झालेली नाही.

आणखी एक रहिवासी अविनाश भोसले, यांनीही तक्रार केली.ते म्हणाले, गेल्या चार दिवसांपासून पाणीपुरवठा बंद आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र कुठलाही ठोस प्रतिसाद मिळाला नाही.

अखेर, तीन दिवसांच्या शोधानंतर पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांनी दोषी जलवाहिनी ओळखून तिची दुरुस्ती केली.पीडब्ल्यूडी अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, पाईपलाइन दुरुस्त करण्यात आली असून, टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठा सुरू करण्यात येत आहे. तथापि, या प्रकारणामुळे नागरिकांमध्ये प्रचंड अस्वस्थता पसरली आहे. स्थानिक प्रशासनाने भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी रहिवाशांकडून करण्यात येत आहे.

# सालपे तलाव प्रदूषण प्रकरण ; उच्च न्यायालयाचे कठोर निर्देश

**बंद आदेशांची त्वरित अंमलबजावणी करा : संबंधित यंत्रणांना कारवाईचे निर्देश**

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४** : सालपे तलाव प्रदूषण प्रकरणात ॲमिकस क्युरी यांनी सादर केलेल्या अहवालावर उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली असून, संबंधित सरकारी यंत्रणांना तातडीने कारवाईचे निर्देश दिले आहेत. यामध्ये दक्षिण गोव्याचे उपजिल्हाधिकारी आणि सासष्टी मामलतदार यांना गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाने (जीएसपीसीबी) जारी केलेल्या व्यावसायिक प्रतिष्ठाने सील करण्याच्या आदेशांची अंमलबजावणी त्वरित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर मडगाव नगर परिषदेने (एमएमसी) जारी केलेल्या बंद आदेशांची त्वरित अंमलबजावणी करावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

मागील सुनावणीदरम्यान ॲमिकस क्युरी यांनी उच्च न्यायालयास एमएमसीच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. तसेच, आदेशाच्या तारखेपासून एका आठवड्यात ४६ आस्थापने सील करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशीही विनंती करण्यात आली होती. न्यायालयाने या मागणीला दुजोरा देत त्वरित अंमलबजावणीसाठी संबंधित यंत्रणांना आदेशित केले आहे.

ॲमिकस क्युरी यांनी मडगाव नगर परिषद आणि जीएसपीसीबीला सील केलेल्या युनिट्समध्ये सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावली जाते का, याची खात्री करण्यासाठी अचानक तपासणी करण्याची मागणी केली होती. त्यानुसार, न्यायालयाने नियमित तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, एसजीपीडीए किरकोळ बाजारातील सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी तात्पुरती उपाययोजना करण्याच्या सूचनाही न्यायालयाने दिल्या आहेत. दिलेल्या कालावधीत योग्य उपाययोजना न केल्यास बाजाराचे कामकाज स्थगित करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

मडगावमधील सांडपाण्याच्या अनियमित विल्हेवाटीच्या मुद्द्यावर ॲमिकस क्युरी यांनी न्यायालयाला अहवाल सादर केला असून, शहरातील जलवाहिन्या आणि वादळी पाण्याच्या नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर सांडपाणी व प्लास्टिक कचरा सोडला जात असल्याचे आढळले आहे. विशेषतः, पथकाने तपासणी केलेल्या बहुतेक नाल्यांमध्ये जलकुंभाची वाढ झाल्याचे दिसून आले आहे. तसेच, एसटीपी प्लांटकडे जाणाऱ्या जलवाहिन्यांमधून पाण्यात तरंगणारे पदार्थ आढळल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

याचिकाकर्ते प्रो. अँटोनियो अल्वारेस यांच्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने ॲमिकस क्युरी यांनी बाधित भागांना भेट दिली. त्यांनी निरीक्षण केले की खारेबांध येथे जलवाहिनीतून खारे पाणी वाहत होते, तसेच लगतच्या निवासी आणि व्यावसायिक युनिट्समधून पाईपद्वारे थेट पाणी नाल्यात सोडले जात होते. एसजीपीडीए मार्केट परिसरातही हीच परिस्थिती असून, बाजारातील सर्व कचरा मोठ्या नाल्यात टाकला जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मडगाव घाऊक मासळी बाजारातही मोठ्या प्रमाणावर अस्वच्छता आढळली. लगतच्या जलवाहिनीच्या सीमेवर कचरा टाकल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे. तसेच, कुडचडकर हॉस्पिटलसमोरील कल्व्हर्टमधून सर्व सांडपाणी एसटीपी प्लांटकडे वाहून नेले जात असले तरीही, त्याचा एक भाग थेट शेतात सोडण्यात येतो, असे धक्कादायक निरीक्षण ॲमिकस क्युरी यांनी नोंदवले आहे. न्यायालयाने संबंधित सरकारी यंत्रणांना प्रस्तुत अहवालाच्या आधारे तातडीने उपाययोजना राबवण्याचे निर्देश दिले असून, प्रतिवादींनी केलेली कारवाई न्यायालयासमोर पुढील सुनावणीच्या तारखेला सादर करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशामुळे मडगावमधील सांडपाणी व्यवस्थापन आणि प्रदूषण नियंत्रणावर काही प्रमाणात नियंत्रण मिळू शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सांडपाणी महामंडळाला एसजीपीडीएबाबत अहवाल सादर करण्याचे निर्देश

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४** : एसजीपीडीए किरकोळ मासळी बाजाराला भूमिगत सांडपाणी लाईनशी जोडणाऱ्या पाईपलाईनच्या कामाबाबत स्थिती अहवाल सादर करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने गोवा सांडपाणी पायाभूत सुविधा विकास महामंडळाला दिले आहेत. न्यायालयाने हा अहवाल चार आठवड्यांच्या आत सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

सांडपाणी पायाभूत सुविधा विकास महामंडळाने सादर केलेल्या शपथपत्रानंतर न्यायालयाने निर्देश जारी केले. या शपथपत्रानुसार, महामंडळाने १७ फेब्रुवारी २०२५ रोजी एसजीपीडीए मार्केट, फातोर्डा येथे मॅनहोल, पंपिंग स्टेशन, राइजिंग मेन आणि पुनर्स्थापना कार्यांसह खंदकविरहित तंत्रज्ञानाद्वारे सांडपाणी नेटवर्क उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली आहे.

दरम्यान, दक्षिण गोवा नियोजन आणि विकास प्राधिकरण (एसजीपीडीए)ने न्यायालयात सादर केलेल्या अहवालात स्पष्ट केले आहे की, एसजीपीडीमार्केटमध्ये तात्पुरते साकळण्याचे खड्डे बांधण्यात येत असून ते १५ दिवसांत पूर्ण होतील. उच्च न्यायालयाने एसजीपीडीए ला पुढील सुनावणीच्या तारखेला स्थिती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

तसेच, एसजीपीडीए बाजारातील मांस विक्री स्टॉलसना गोवा राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमती मिळालेली असली तरी बाजारासाठी स्वतंत्र सांडपाणी व्यवस्थापन सुविधा अस्तित्वात नाही.यामुळे बाजारातून निघणारा कचरा आणि सांडपाणी थेट वादळी नाल्यांमध्ये मिसळते, ज्याचा शेवटी साल नदीवर प्रतिकूल परिणाम होतो.

## ध्वनी प्रदूषणाविरोधातील लढ्याला अनपेक्षित धक्का

टीम दैनिक हेराल्ड

**वागातोर, दि. ४** : हणजूण आणि वागातोर येथील ध्वनी प्रदूषणाविरोधातील संघर्षाला सोमवारी अनपेक्षित कलाटणी मिळाली. गोवा सरकारने नॉईज मॉनिटरिंग कमिटीच्या (एनएमसी) सदस्यपदी जेनी क्रॅस्टो यांची नियुक्ती अचानक रद्द केल्याने स्थानिक रहिवासी आश्चर्यचकित आणि निराश झाले.

सुरुवातीला सरकारने क्रॅस्टो यांच्या नियुक्तीला संमती दिली होती. मात्र, नंतर ती मागे घेत महाधिवक्ता देवीदास पांगम यांचे समर्थन केले. क्रॅस्टो यांनी याआधी ध्वनी प्रदूषण करणाऱ्या आस्थापनांविरुद्ध तक्रारी दाखल केल्या आहेत. त्यामुळे समितीमध्ये त्यांची निवड हितसंबंधाच्या संघर्षास कारणीभूत ठरू शकते, असे पांगम यांनी स्पष्ट केले.

या निर्णयामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. त्यांची नियुक्ती झाली तेव्हा आम्हाला आशा वाटली होती, पण आता ती रद्द झाल्याने उच्च न्यायालयाने कठोर भूमिका घ्यावी लागेल, असे रहिवासी शेरिल डिसोझा यांनी सांगितले.

तथापि, जेनी क्रॅस्टो यांनी आपली भूमिका स्पष्ट करत ठाम भूमिका घेतली. माझ्या गावाच्या लोकांना माझ्यावर विश्वास आहे. मी न्यायासाठी लढत राहीन. मी आजारी, वृद्ध आणि दुर्बल व्यक्तींना शांत झोप मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत राहीन, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

नॉईज मॉनिटरिंग कमिटीसाठी ॲमिकस क्युरी निगेल कोस्टा फ्रियास यांनी जेनी क्रॅस्टो, जेरेमी फेरेरा आणि इनासिओ फर्नांडिस यांच्या नावांची शिफारस केली होती. सरकारने सुरुवातीला फेरेरा आणि फर्नांडिस यांच्या नियुक्तीला नकार दिला, मात्र क्रॅस्टो यांना मान्यता दिली. मात्र, याचिकाकर्ते डेसमंड अल्वारेस यांनी याला आक्षेप घेतल्याने त्यांच्या नियुक्तीला देखील विरोध करण्यात आला.

अल्वारेस यांनी क्रॅस्टो पूर्णवेळ या भूमिकेसाठी उपलब्ध नाहीत आणि त्यांचे पर्यटन व्यवसायाशी संबंध आहेत असा दावा केला. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक यांनी या वादात हस्तक्षेप करून सरकारला गावाच्या बाहेरील स्वतंत्र आणि निष्पक्ष व्यक्तीची नियुक्ती करण्याचा सल्ला दिला.

मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाच्या देखरेखीनंतरही हणजूण आणि वागातोर मधील काही आस्थापने रात्री १० नंतरही मोठ्या आवाजात संगीत वाजवत आहेत. स्थानिक रहिवासी सतत तक्रारी करत असूनही परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही.

मी आपत्कालीन हेल्पलाइन ११२ वर वारंवार फोन करते, पण काहीही बदल होत नाही, असे रहिवासी एव्हलिन फर्नांडिस यांनी सांगितले. स्थानिक नाईटक्लबच्या मालकाने माझा विरोध शांत करण्याचा प्रयत्न केला,असा गंभीर आरोपही त्यांनी केला.

नॉईज मॉनिटरिंग कमिटी सदस्यांची निवड कशी होईल, यावर अद्याप निर्णय झालेला नाही. मात्र, जेनी क्रॅस्टो यांची निवड रद्द केल्यानंतर, स्थानिक प्रतिनिधित्व असलेल्या व्यक्तींची निवड करण्याची मागणी पुन्हा जोर धरत आहे. आमच्या गावात ध्वनी प्रदूषणाचा सर्वाधिक त्रास ज्यांना होतो, त्यांनीचनॉइज मॉनिटरिंग कमिटीचा भाग असायला हवे, असे जेरेमी पेरेरा यांनी स्पष्ट केले. येत्या काळात न्यायालय आणि सरकार कोणता निर्णय घेते, याकडे स्थानिकांचे लक्ष लागले आहे.

# दक्षिण गोव्यात टेकडी तोड प्रकरणांत वाढ

**पोलिस तपास अधांतरी : पोलिस ठाण्यात २१ प्रकरणे नोंदवली : १६ प्रकरणे उघडकीस**

टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ४** : दक्षिण गोव्यात, विशेषतः काणकोण परिसरात, २०२४ मध्ये अनधिकृत उत्खनन आणि टेकडी तोड प्रकरणांमध्ये मोठी वाढ झाली आहे. या वाढत्या प्रकारांमुळे पर्यावरणीय समतोल बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, संबंधित प्रकरणांमध्ये अनेक गुन्हे नोंदवले गेले असले तरीही, पोलिस तपास अद्याप पूर्णत्वास गेलेला नाही आणि अनेक आरोपी अद्याप 'अज्ञात' असल्याचे समोर आले आहे.

पोलिसांकडील माहितीनुसार, १८ डिसेंबर २०२४ पर्यंत दक्षिण गोव्यातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये एकूण २१ प्रकरणे नोंदवली गेली. यापैकी १६ प्रकरणे उघडकीस आली असली, तरी अजूनही अनेक प्रकरणांचा तपास सुरू आहे. तुलनात्मकदृष्ट्या, २०२३ मध्ये याच कालावधीत १५ गुन्हे नोंदवले गेले होते, त्यापैकी आठ प्रकरणे सोडवण्यात पोलिसांना यश आले होते.

९ डिसेंबर २०२४ रोजी, काणकोण पोलिसांनी दत्तराज कामत यांच्याविरुद्ध अनधिकृत टेकडी तोडीच्या आरोपाखाली नगर नियोजन (टीसीपी) कायदा १९७४ च्या कलम १७–अ आणि १७–ब अंतर्गत गुन्हा नोंदवला. त्याच दिवशी, उपनगर नियोजन कार्यालयाच्या तक्रारीनंतर, एका बांधकाम व्यावसायिकाविरुद्ध भातशेतीसाठी राखीव असलेल्या जमिनीत माती भरल्याच्या आरोपाखाली आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला.

नोव्हेंबर २०२४ मध्ये, पोळे येथील आनंद नाईक, कृष्णा नाईक आणि उल्हास नाईक यांच्याविरुद्ध लोलये आणि आगोंद येथे बेकायदेशीर टेकडी तोड प्रकरणी गुन्हे नोंदवले गेले. तसेच, ७ नोव्हेंबर रोजी आगोंद परिसरात पुरूषोत्तम नाईक गावकर यांच्याविरुद्धही अनधिकृत टेकडी तोड प्रकरणी एफआयआर दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा तपास पीएसआय राजशेखर रेड्डी करत आहेत.

डिसेंबर २०२४ मध्ये, मडगाव नगर आणि देश नियोजन विभागाचे अधिकारी रोहन गावकर यांनी सासष्टी तालुक्यातील कुंकळ्ळी गावात झालेल्या अनधिकृत टेकडी तोडीविरोधात तक्रार दाखल केली. त्यानुसार, पोलिसांनी अब्दुल गनी शेख यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.ऑक्टोबर २०२४ मध्ये, केपे उपनगर नियोजक शैलेश नाईक यांच्या तक्रारीनंतर, सांगे येथील आरोपी देवदत्त पाटील यांच्याविरुद्ध टेकडी तोड प्रकरणी कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, या गुन्ह्याचा तपास पीएसआय सिद्धेश नाईक करत आहेत.सप्टेंबर २०२४ मध्ये, फोंडा पोलिसांनी समीर वाचसुंदर यांच्याविरुद्ध धारबांदोडा येथे अनधिकृत टेकडी तोड प्रकरणी गुन्हा नोंदवला. नियोजन विभागाच्या तक्रारीनुसार, वाचसुंदर यांनी आवश्यक परवानग्या न घेता टेकडी तोडली होती.

राज्य सरकारने तलाठ्यांना अशा घटनांवर सतत लक्ष ठेवण्याचे आणि त्वरित अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांनी तलाठ्यांना सुट्टीच्या दिवशीही तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत, जेणेकरून अनधिकृत बांधकामे आणि उत्खनन वेळीच रोखता येईल.दक्षिण गोवा जिल्हाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, या आदेशांचे पालन न केल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई केली जाईल. याशिवाय, राज्य आपत्ती व्यवस्थापन समितीच्या बैठकीत पुढील संभाव्य भूस्खलन रोखण्यासाठी बहुआयामी धोरण राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या अंतर्गत, तलाठ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील खासगी आणि सार्वजनिक जमिनींवर अनधिकृत उत्खनन आणि टेकडी तोडीच्या घटनांचे सखोल निरीक्षण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याबाबत तक्रारी त्वरित जिल्हा नियंत्रण कक्षाकडे किंवा फ्लाइंग स्क्वॉडकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.